स्थापना
१ मे १९५७

# कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे – ४११०३७
www.apmcpune.in / Email: admin@apmcpune.in, kubspune37@rediffmail.com

जा.क्र.प्रशा/स्थापत्य/मांजरी/त.व पा.वि.क.३ से.हॉ.रंगरंगोटी./१७५/२०२६-२७ दि.30/०४/२०२६

**प्रसिध्दीपत्रक**

**विषय**:- कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेच्या, मांजरी उपबाजार आवारातील तरकारी व पालेभाजी विक्री करणेकरीता ३ सेलहॉलला रंगरंगोटी करणे कामाबाबत..

सक्षम ठेकेदारांना कळविणेत येते की, कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेच्या मांजरी उपबाजार आवारातील तरकारी व पालेभाजी विक्री करणेकरीता ३ सेलहॉलला रंगरंगोटी करणे काम करावयाचे आहे. सदर काम हे शासनाने आदेशित केलेल्या सर्व अटींचे काटेकोरपणे पालन करूनच करावयाचे आहे. काम करतेवेळी कोणत्याही कामगारांची वित्त / जिवितहानी / अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. काम करावयाच्या ठिकाणी आपण स्वत: (ठेकेदार) यांनी संस्थेच्या स्थापत्य विभागाच्या संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यासोबत जाऊन, प्रत्यक्षरित्या कामाची पाहणी करुन तद्नंतरच आपल्या मोहरबंद दरपत्रके सादर करावीत. काम करतेवेळी कोणत्याही अटीचा भंग झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत ठेकेदाराची राहील.

तरी सदर कामाची दरपत्रके स्थापत्य विभागात उपलब्ध आहेत. सदर कामाची दरपत्रके दि.३०/०४/२०२६ ते दिनांक०७/०५/२०२६ पावेतो मुख्य कार्यालयात मिळतील. सदर कामाची मोहरबंद दरपत्रके दि०८/०५/२०२६ अखेर या कार्यालयात सादर करावीत. सादर झालेली मोहरबंद दरपत्रके शक्य झाल्यास त्याच दिवशी अथवा दिनांक११/०५/२०२६ रोजी उपस्थित ठेकेदारांसमोर उघडण्यात येतील, कोणतेही अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेने राखुन ठेवला आहे, याची नोंद घ्यावी.

सदरचे प्रसिद्धीपत्रक मुख्य कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर व बाजार समितीच्या (Www.apmcpune.in) या संकेत स्थळावर दर्शविणेत येत आहे.

सचिव
कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

फोन : +९१ २० २४२६०२०३ / २४२६२३४९ / २४२७२८८७